# तो पर्यंत..


जो पर्यंत वाटते तो पर्यंत
देत रहायचे, घेत रहायचे प्रेम
बोलत रहायचे भरभरून -
उर भरून येई पर्यंत !

असेच ठरवले होते ना आपण,
भेटत होतो जेंव्हा जेंव्हा
उलटायचे मग तासन् तास
काळोख भरून येई पर्यंत !

गाण्याची एक आर्त धून
चहाच्या गरम वाफे बरोबर
झिरपत जायची रोमारोमात
मन था-यावर येई पर्यंत !

किंवा,
कवितेची ओळ एखादी
पुसट पुसट उमटत रहायची
अवघडलेल्या ओठांवर...
हातात हात घेई पर्यंत !

थांबलं बहुदा वाटणं ते
मधेच कुठेसं विरून गेलं..
आता आयुष्य त्या क्षणांचं
आठवण साथ देई पर्यंत !

©प्रीती देशपांडे